// स्त्रीशक्तितुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
Maharashtra State Commission for Women

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक :- ममआ-२०२५/नवरात्र/का-६/ 660
दिनांक :- ०६/१०/२०२६

नोटीस

विषय :- नवरात्रीत्सव काळात सोशल मीडियावर प्रसारित करण्याकरिता विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या महिलांचे व्हिडिओ बनविण्यासाठी निविदा मागविणेबाबत.

स्त्रीशक्तीला समर्पित असा नवरात्रीत्सव दिनांक ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होत आहे. स्त्रीशक्तीचे प्रतिक असलेल्या या सणादरम्यान महिलांना प्रोत्साहित करावे, तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या महिलांच्या कार्याचा गौरव करावा, यासठी नवरात्रीचे औचित्य साधून राजकारण, समाजकारण, क्रिडा आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या १० महिलांचे १ ते ३ मिनिटांचे व्हिडीओ तयार बनविण्यासाठी नामांकित संस्थांकडून संपुर्ण माहितीसह सीलबंद लखोटयात निविदा मागविण्यात येत आहेत. उल्लेखनीय कार्य करणा-या महिलांचे ६ व्हिडिओ खालील प्रमाणे बनविण्यात यावे.

अ.क्र.	विषय	कालावधी
१.	• विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या महिलांबाबत संशोधन करत माहिती संकलित करणे. नावांची यादी आयोगास सादर करुन अंतिम नावे निश्चित करुन घेणे. • निवड झालेल्या महिलांच्या व्हिडिओ करिता संहिता लेखन, संपादन, माहिती संकलित करणे, संपादन, संगीत, संपादन करुन व्हिडिओ व ग्राफिक्स स्टँडर्ड साईझचे १०८० पिक्सेल तसेच समाजमाध्यमांमध्ये प्रसारित करण्यासाठी अपेक्षित पद्धतीचे असावे. • सदर पुर्ण झालेले व्हिडिओ १० त्यांच्या संहितेसह आयोगास पेन ड्राईव्हमधे देण्यात यावे.	दिनांक ११ ते २० ऑक्टोबर २०२६

तरी इच्छुक असणाऱ्या दरपत्रकधारकाने आपले दरपत्रक स्वतःच्या लेटरहेडवर आयोग कार्यालयास सिलबंद लिफाफ्यात दि.८/१०/२०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत. सदर निविदेमध्ये रक्कम रुपये, G.S.T. नंबर, H.S.N. Code व लागू कर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी. तसेच नोटीस संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. सदर प्रक्रियेबाबत कोणताही बदल किंवा रद्द करण्याचा पूर्ण अधिकार मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेकडे राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

(मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने)

6/10/2026

प्रशासकीय अधिकारी

Scanned with OKEN Scanner